मा.उच्च न्यायालय, मुंबई सिव्हील ॲपलिकेशन नं. ७८/२००७ महाराष्ट्र शासन विरुद्ध सुपरमॅक्स इंटरनॅशनल प्रायव्हेट लि. मुंबई. सदर दाव्यामध्ये ॲड. गिरीश गोडबोले यांची विशेष समुपदेशी म्हणून फी अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक : न्यायाप्र२०१६/प्र.क्र.१८८/२२-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक: ९ नोव्हेंबर, २०१७

<u>वाचा</u> - १) विधी व न्याय विभागाचे पत्र क्र. ५९५-२०१३/ई-शाखा, दि. २३.०८.२०१३.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: विसप्र-२०१५/ प्र.क्र.२१/२०१५/ विनियम, दि.२९.०७.२०१५.

<u>प्रस्तावना</u> :-

संदर्भाधीन क्र.१ च्या प्रस्तावानुसार Civil Revision Application No. ७८/२००७ हा महाराष्ट्र शासन विरुद्ध सुपरमॅक्स इंटरनॅशनल प्रायव्हेट लि. मुंबई दावा मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सुनावणीस होता. सदरचा दावा दि. १६.११/२०१६ रोजी होता. शासनाच्या वतीने सदरचा दावा चालविण्यासाठी ॲड. गिरीश गोडबोले यांची विशेष समुपदेशी म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती. उक्त दाव्यामध्ये ॲड. गिरीश गोडबोले, विशेष समुपदेशी सदर सुनावणीकामी फी म्हणून त्यांनी आकारलेली व शासनास सादर केलेले वकील फीबाबतचे शुल्क अदा करण्याची बाब सदर नस्तीवर विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील Civil Revision Application No. ७८/२००७ बाबत शासनाच्या वतीने सदरचा दावा चालविण्यासाठी ॲड. गिरीश गोडबोले यांची विशेष समुपदेशी यांनी सादर केलेल्या देयकाच्या अनुषंगाने उपलब्ध निधीमधून त्यांचे व्यावसायिक शुल्क (वकील फी) खालीलप्रमाणे अदा करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

अक्र.	विधिज्ञाचे नांव	देयकाची रक्कम	१०/% आयकर	आयकर वर ३ % शिक्षण उपकर	एकूण वजावट	एकूण देय रक्कम
१	२	३	४	५	६	७
१	ॲड. गिरीश गोडबोले	४०,०००.००	४,०००.००	१२०.००	४१२०.००	३५८८०.००
२	ॲड. गिरीश गोडबोले	६०,०००.००	६,०००.००	१८०.००	६१८०.००	५३८२०.००
		१,००,०००.००	**१०,०००.००**	**३००.००**	**१०,३००.००**	**८९,७००.००**

२. या शासन निर्ण्यानुसार मंजूर करण्यात आलेल्या रु. ८९,७००/- (रुपये एकोणनव्वद हजार सातशे फक्त) चा धनादेश ॲड. गिरीश गोडबोले यांचे नावे काढण्यात यावा. तसेच, धनादेश दिल्याची पोचपावती घेण्यात यावी.

३. सदर रक्कम वितरित करण्याकरिता श्री. र. गं. बोड्डू, कार्यासन अधिकारी, रोखशाखा, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, डॉ. सुदिन गायकवाड, उपसचिव (रोखशाखा) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग , मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र. व्ही-२, ३४५१- सचिवालय आर्थिक सेवा (०९०) सचिवालय (०१)(०१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (दत्तमत)(३४५१ ०३०४)२८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला, उपविभाग दोन मधील अनुक्रमांक ४९ नियम क्र. १६६-अ अन्वये प्रशासकीय विभागांना असलेल्या अधिकारांतर्गत निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.masharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन त्याचा संकेतांक २०१७११०९१७४०३७७५०२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deepak S Desai

Digitally signed by Deepak S Desai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMT Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d11b2ee4dfa01facc6e58028a3bde93d4ac81d87ed6247ca0fb3a827602426f, cn=Deepak S Desai
Date: 2017.11.09 17:29:48 +05'30'

(दि. शि. देसाई)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक,
२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई,
४) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई,
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
६) कक्ष अधिकारी (रोख शाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी,
७) वित्त विभाग, कार्यासन व्यय-२ व अर्थ-३, मंत्रालय, मुंबई,

८) ॲड. गिरीश गोडबोले, १४ व १५, गुंडेचा चेंबर्स, तळमजला, ॲश लेन, नगिनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई,

९) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,मुंबई (१) शहर, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई,

१०) निवड नस्ती २२-स.